International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 11 No. 3 Jan-Feb 2024

# परकीय कर्जाबाबतचे सैदांतिक दृष्टिकोन आणि सद्यस्थितीतील कर्जाबाबतचा आढावा

**श्रीमती. विद्या भिका थोरात[1], प्रो. डॉ.सुहास आव्हाड[2]**
[1]संशोधिका, पदव्युत्तर अर्थशास्त्र संशोधन केंद्र, सहकारमहर्षी भाउसाहेब संतुजी थोरात
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, संगमनेर, जि. अहमदनगर.
[2] मार्गदर्शक, सहकारमहर्षी भाउसाहेब संतुजी थोरात
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, संगमनेर, जि. अहमदनगर.
**Corresponding Author – श्रीमती. विद्या भिका थोरात**
**Email:** vbthorat008@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.10792634**

**गोषवारा –**

शासनाच्या अंदाजपत्रकीय धोरणात अठराव्या शतकापासून शासकीय कर्जाला महत्त्वाचे स्थान प्राप्त होऊ लागले. आर्थिक महामंदीनंतरच्या काळात शासनाकडून उभारले जात असलेले कर्ज म्हणजेच शासकीय कर्ज अधिक महत्त्वाचे मानले जात आहे. अलीकडील काळात कर आकारणी, शुल्क, शासकीय प्रकल्पांपासून मिळणारा लाभ यांसारख्या मागणीप्रणीत शासकीय कर्ज हाही शासनाच्या उत्पन्नाचा नेहमीचा व सर्वसाधारण मार्ग मानला जातो. देशातील शासन आपल्या देशातील नागरिकांकडून किंवा परकीय देशातील लोकांकडून व परकीय सरकारकडून कर्ज घेऊ शकते. अशा प्रकारचे कर्ज उभारणे व त्याचे योग्य व्यवस्थापन करणे हे अलीकडील काळात सर्वसाधारण राज्यवित्तीय धोरणाचे एक महत्त्वाचे अंग बनले आहे. पूर्वी खासगी व्यक्तिगत कर्जाच्या बाबतीतील दृष्टिकोन आणि शासकीय कर्जाच्या बाबतीतील दृष्टिकोन या दोहोंमध्ये विशेष फरक केला जात नसे, दोन्ही प्रकारच्या कर्जाकडे साधारणपणे एकाच दृष्टिकोनातून पाहिले जाई. पण अलीकडील काळात मात्र या दोहोंपैकी प्रत्येक कर्जाकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगवेगळा आहे. परकीय कर्जाच्या बाबतीत असे म्हणता येईल की, शासनाला अशी कर्जे परदेशातील व्यक्ती व संस्था यांच्याकडून मिळविता येणे शक्य असते. त्याचप्रमाणे परकीय देशांच्या सरकारांकडून अशी करें उभारता येणे शक्य असते. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक बँता यांसारख्या आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांकडून अल्प आणि दीर्घ मुदतीची कर्ज मिळू शकतात.

**प्रस्तावना –**

आधुनिक शासन सार्वजनिक क्षेत्रातील मालमत्ता कर आणि इतर मागनि उत्पन्न मिळवितात आणि जनतेच्या कल्याणासाठी खर्च करतात. सरकारची कार्ये वाढल्याने त्यांना कराव्या लागणाऱ्या खर्चात वाढ झाली आहे त्यामुळे उत्पन्न व खर्चातील तफावत भरून काढण्यासाठी सरकारला सार्वजनिक कर्ज घ्यावे लागते. सरकारने कमीत कमी कर्ज घ्यावे हा जुना दृष्टिकोन मागे पडला असून मोठ्या प्रमाणात वाढलेला सार्वजनिक खर्च भरून काढण्यासाठी सार्वजनिक कर्ज उभारणे आवश्यक झाले आहे. सरकारने आपल्या वित्तीय जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी घेतलली कर्जे म्हणजे सार्वजनिक कर्ज होय. सार्वजनिक कर्ज हि सर्व देशांच्या राजकोषीय धोरणाचा अत्यंत महत्त्वाचा घटक मानला जातो. सनातनपंथीय अर्थशास्त्रज्ञाचा सार्वजनिक कर्जाला विरोध होता परंतू आधुनिक काळात सार्वजनिक कर्जाकडे पहाण्याचा दृष्टिकोन बदललेला आहे आधुनिक अर्थशास्त्रज्ञ सार्वजनिक कर्जाची उभारणी एक आवश्यक बाब मानतात, व्यापार चक्राची तीव्रता कमी करण्यासाठी, आर्थिक विकासात देशातील नागरिकांचा सहभाग मिळविण्यासाठी, नैसर्गिक संकटांना तोंड देण्यासाठी सार्वजनिक कर्जाचे आधुनिक अर्थशास्त्रज्ञ समर्थन करतात. सार्वजनिक सत्तेच्या उत्पन्नापेक्षा खर्च जास्त असेल तर सार्वजनिक सत्तेने कर्ज उभारावे परंतु उत्पन्नापेक्षा कर्ज जास्त वाढणार नाही याची दक्षता सार्वजनिक सत्तेने घेणे आवश्यक आहे.

**सार्वजनिक कर्ज अर्थ व व्याख्या -**

१) "शासनाने लोकांकडून अल्पकालीन व दिर्घकालीन स्वरूपाची जी कर्जे उभी केली जातात त्या कर्जाना सार्वजनिक कर्ज म्हणतात."
२) "केंद्र सरकार, राज्य सरकार आणि स्थानिक सरकार यांनी उभारलेल्या सर्व कर्जाचा समावेश सार्वजनिक कर्जात होतो."

**शोधनिबंधाची उद्दिष्टे –** संशोधिकेने शोधिबंधाची पुढील उद्दिष्टे मांडली आहेत.

१. परकीय कर्जाबाबतचे सैद्धांतिक दृष्टिकोन अभ्यासणे.
२. परकीय कर्ज व्यवस्थापनाचे अध्ययन करणे.
३. जगातील प्रमुख देशातील परकीय कर्जाचा आढावा घेणे.

**संशोधन पद्धती –** प्रस्तुत शोधिबंधाचा प्रकार वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक आहे.

**तथ्य संकलन –**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी तथ्य संकलन अतिशय महत्त्वाचे आहे. तथ्य म्हणजे माहिती. तथ्य संकलन करण्यासाठी प्रकाशित साहित्याचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये विविध शोधनिबंध, संदर्भग्रंथ, पुस्तके, मासिके, वर्तमानपत्र, इंटरनेटवरील माहिती यांचा वापर करण्यात आला आहे.

**सार्वजनिक कर्ज प्रमाण -**

केंद्र सरकार, राज्य सरकार आणि स्थानिक सरकार यांनी उभारलेल्या कर्जास सार्वजनिक कर्ज म्हणतात. सार्वजनिक कर्जात अंतर्गत कर्ज व बाह्य कर्जाचा समावेश होतो. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताने कल्याणकारी राज्याचा स्वीकार केला आहे आणि विकासात्मक धोरण राबविण्यास सुरुवात केली आहे. भारत एक वेगाने विकसित होणारी अर्थव्यवस्था आहे. त्यामुळे भारताच्या सार्वजनिक कर्जात सातत्याने वाढ होत आहे. पुढील कोष्टकात भारताचे सार्वजनिक कर्ज आणि सार्वजनिक कर्जाचे स्थूल देशांतर्गत उत्पादनाशी असणारे प्रमाण दर्शविले आहे.

**सार्वजनिक कर्ज व्यवस्थापन तत्वे –**

सार्वजनिक उत्पन्नापेक्षा सार्वजनिक खर्च जास्त असल्यास सरकारला सार्वजनिक कर्ज घ्यावे लागते. कर आकारणीविषयी सरकारची ज्याप्रमाणे धोरणे निश्चित केलेली असतात त्याचप्रमाणे या धोरणांची अंमलबजावणी शासनाच्या संबंधित विभागाकडून केली जाते. ज्याप्रमाणे खाजगी व्यक्तीवर कर्जाचा बोजा पडत असतो त्याचप्रमाणे सरकारवर ही कर्जाचा बोजा प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे पडत असतो. त्यासाठी सरकारला काळजीपूर्वक कर्जाचा वापर करावा लागतो. कर्जाची परतफेड योग्यवेळी करणे, कर्जाचा वापर योग्य कारणासाठी करणे, आवश्यक तेवढेच कर्ज घेणे याबाबत सरकारला योग्य निर्णय घ्यावा लागतो.

सार्वजनिक कर्जाच्या व्यवस्थापनामध्ये कर्जफेड, कर्जाचा अर्थव्यवस्थेतील प्रवाह, कर्जाचा विनियोग आणि व्याजदर अशा सर्व गोष्टी समाविष्ट होतात. कर्जाचे व्यवस्थापन करणे अत्यंत आवश्यक आहे कारण कर्जाचा भार समाजावर पडतो आणि म्हणूनच कर्जफेडीचे व्यवस्थापन असेल तर शासनाबद्दल विश्वासाचे वातावरण निर्माण होण्यास हातभार लागतो. भारतात मध्यवर्ती बँकेच्या सहाय्याने तसेच केंद्र व राज्यसरकारचे प्रतिनिधी सार्वजनिक कर्जाचे व्यवस्थापन करतात.

**सार्वजनिक कर्जाचे दृष्टिकोन –**

सनातनपंथीय अर्थशास्त्रज्ञ अॅडम स्मिथ, रिकार्डो, मिल यांच्या मते, सरकारचा खर्च मर्यादित असावा. सरकारने फक्त महत्त्वाची कार्य करावीत. कर्ज घेतली तर त्याचा वापर उत्पादक कारणासाठीच करावा कारण त्यांच्या मते, सार्वजनिक कर्जाचे परिणाम पुढीलप्रमाणे होतात.

१) सार्वजनिक कर्जाचा भावी पिढीवर परिणाम होतो.
२) सार्वजनिक कर्जामुळे भाववाढ होते.
३) सार्वजनिक कर्जामुळे पैशांचा गैरवापर करण्याची प्रवृत्ती वाढते.
४) सार्वजनिक कर्जाचा वापर अनुत्पादक कारणासाठी होतो.
५) वाढत्या सार्वजनिक कर्जामुळे व्याजाचा दर वाढत जातो त्यामुळे खाजगी गुंतवणूक कमी होऊन आर्थिक विकासात अडथळा येतो.

या कारणांमुळे सनातन पंथीय अर्थशास्त्रज्ञांचा सार्वजनिक कर्ज घेण्यास विरोध होता.

**केन्सचा दृष्टिकोन –**

१९२९ च्या मंदीनंतर सनातन पंथीय अर्थशास्त्रज्ञांचे विचार पूर्णपणे केन्सने खोडून काढले. केन्सने “The General Theory of Employment, Interest and Money” हा ग्रंथ लिहिला आणि सरकारी हस्तक्षेपाचे महत्व पटवून दिले. केन्सच्या मते आर्थिक विकास साध्य करण्यासाठी सार्वजनिक खर्चाचे महत्व आहे. अर्थव्यवस्थेत सार्वजनिक आयव्यय आर्थिक स्थैर्य प्रस्थापित करण्यासाठी, आर्थिक विकास होण्यासाठी पूर्ण रोजगार साध्य करण्यासाठी सार्वजनिक कर्ज आवश्यक आहे.

**आधुनिक अर्थशाखज्ञ –**

प्रा. हेन्सन, प्रा. लर्नर यांनी सार्वजनिक कर्जाचा आधुनिक दृष्टिकोन मांडला. आधुनिक अर्थशास्त्रज्ञान मते, सार्वजनिक कर्जाचा लाभ भावी पिढीला मिळतो. आधुनिक अर्थतज्ञांनी सार्वजनिक कर्जाचा पुरस्कार खालील कारणांमुळे केला.

१) सार्वजनिक कर्जाचा वापर मंदीवर नियंत्रण प्रस्थापित करण्यासाठी करता येतो.
२) सार्वजनिक कर्जामुळे अर्थव्यवस्थेची उत्पादकता वाढते.
३) सार्वजनिक कर्जामुळे आर्थिक विकासाला चालना मिळते.
४) सार्वजनिक कर्जामुळे आर्थिक स्थैर्य प्रस्थापित करता येते.
५) सार्वजनिक कर्जामुळे कल्याणकारी योजना राबविता येतात.

थोडक्यात, आर्थिक विकासासाठी सार्वजनिक कर्ज महत्त्वाचे आहे आणि सार्वजनिक कर्जाचा विनियोग होण्यासाठी सार्वजनिक कर्जाच्या व्यवस्थापनाला अनन्यसाधारण महत्व आहे.

**सार्वजनिक कर्ज व्यवस्थापनाचे महत्त्व -**

१) अनावश्यक कर्ज रोखण्यासाठी, अनुत्पादक कर्ज रोखण्यासाठी, आवश्यक कर्जाचे प्रमाण ठरविण्यास नियोजन करता येते.

२) सार्वजनिक कर्जाचे व्यवस्थापन हे उपलब्ध रक्कमांच्या योग्य वितरणासाठी महत्त्वाचे आहे.

३) कर्जाच्या व्यवस्थापनामुळे कर्जाची परतफेड योग्यवेळी करता येते.

**सार्वजनिक कर्जाचे व्यवस्थापन विविध तत्वे -**

१) **कर्ज उभारणीचा खर्च किमान पातळीवर असावा** - सरकारच्या दृष्टीने कर्ज उभारणीचा खर्च कमीत कमी

असावा. सरकारला व्याजाच्या रक्कमा, मुद्दल परतफेड करणे जास्तीत जास्त सुलभ जावे. जर सार्वजनिक कर्जाचे व्याजदर कमी असतील तर कर्जाची परतफेड करण्यासाठी शासनाला जनतेवर कर आकारणी करावी लागणार नाही.

२) **कर्जाचे व्यवस्थापन लवचिक असावे** - कर्जाचे व्यवस्थापन अशा प्रकारचे असावे कि, सरकार गरज पडल्यास सहजपणे अल्पकालीन कर्जाचे दीर्घकालीन कर्जात रूपांतर करता यावे परंतु कर्ज परतफेडीसार मुदतवाढ करीत असताना आर्थिक स्थैर्य धोक्यात येता कामा नये.

३) **सुसंवादित्व -** वित्तीय आणि राजकोषीय धोरण तसेच सार्वजनिक कर्जाचे व्यवस्थापन यामध्ये सुसंवाद असावा. आर्थिक विकास होत असताना आर्थिक स्थैर्य साधले गेले पाहिजे.

४) **गुंतवणूकदारांच्या समस्येचा समतोल विचार** - सार्वजनिक कर्जाचे व्यवस्थापन करताना गुतंवणूकदारांच्या बाजूचा विचार केला जावा कारण कर्जाची उभारणी जनतेच्या सहकार्यावर अवलंबून असल्यामुळे शासकीय कर्ज रोखण्याचे स्वरूप व खरेदी-विक्री त्यासंबंधीच्या अटी समाधानकारक असाव्यात. शासनाने कर्ज उभारणी करताना जनतेचा विचार करणे आवश्यक आहे.

५) **समान न्याय तत्व** - कर्जाची परतफेड मुदत संपताच करण्यात यावी. सार्वजनिक कर्जाची परतफेड मुदत संपताच केली नाही तर कर्जावरील व्याजाचा बोजा वाढत जातो म्हणून कर्जाची परतफेड केव्हा करणार, कशी करणार, त्यासाठी उत्पन्नाचे मार्ग कोणते? याबाबत धोरण ठरविण्यात यावे.

**शासकीय कर्जाच्या परतफेडीचे मार्ग –**

शासनाचे कर्ज मोठ्या प्रमाणात वाढत राहिल्यास देशातील लोकांच्या मनात अविश्वासाचे वातावरण निर्माण होण्याची शक्यता असते. शिवाय वाढत्या शासकीय कर्जामुळे वाढत्या कर आकारणीचा बोजा लोकांना सहन करावा लागतो. म्हणून शासकीय कर्जाची फेड वेळच्या वेळी करणे इष्ट असते. शासकीय कर्ज उत्पादक कार्याकरिता गुंतविले गेले असल्यास शासनाचे उत्पन्न वाढणे शक्य असते. त्या वाढत्या उत्पन्नातून कर्जफेड करता येते. तथापि शासकीय कर्जापैकी बराचसा भाग अनुत्पादक कारणांसाठी खर्च केला गेला असेल तर मात्र अशा कर्जाची परतफेड करण्याचा प्रश्न बिकट होतो. सर्वसाधारणपणे शासकीय कर्जाची फेड करण्यासाठी पुढील मार्गांचा अवलंब केला जातो.

**कर्ज नाकारणे किंवा बुडविणे –**

कर्जावरील व्याज देण्यास आणि कर्जाची रक्कम परत करण्यास नकार देऊन कर्जफेडीचा प्रश्न सोडविता येतो. पण सर्वसामान्यपणे अंतर्गत व परदेशी कर्ज नाकारण्याचा मार्ग सरकारकडून अनुसरला जात नाही कारण त्यामुळे ऋणको सरकारची देशातील व परदेशांतील पत व प्रतिष्ठा कमी होते. तरीपण अंतर्गत व परकीय कर्ज नाकारल्याची काही उदाहरणे आहेत. सन १९१७ च्या क्रांतीनंतर रशियात अधिकारावर आलेल्या साम्यवादी सरकारने पूर्वीच्या इरारच्या कारकीर्दीत उभारली गेलेली देशांतर्गत कर्ज फेडण्यास नकार दिला. इंडोनेशिया स्वतंत्र झाल्यानंतर पूर्वीच्या वसाहतवादी सत्ताधिकाऱ्यांनी इंडोनेशियाच्या वतीने हॉलंडमध्ये उभारलेले परकीय कर्ज फेडण्याचे इंडोनेशियाच्या सरकारने नाकारले पण कर्ज नाकारल्याची अशी उदाहरणे फक्त अपवाद म्हणूनच आढळतात.

**कर्जाचे परिवर्तन -**

सरकारने उभारलेल्या जुन्या कर्जाचे नवीन कर्जात रूपांतर करून त्याद्वारे कर्जफेड करता येणे शक्य असते. कर्जफेडीच्या वेळी सरकारजवळ आवश्यक तेवढी वित्तीय साधनसामग्री नसेल तर कर्जफेडीसाठी परिवर्तनाचा मार्ग अवलंबिता येणे शक्य असते. त्याचप्रमाणे जुन्या कर्जाच्या परिवर्तनाच्या वेळी जुन्या रोख्यांबद्दल देण्यात येणाऱ्या नवीन रोख्यांवर जुन्या रोख्यांवरील व्याजदरापेक्षा अधिक व्याजदर देऊन रोखे धारकांना हे नवीन रोखे घेण्यास उद्युक्त केले जाते. कर्जाचे परिवर्तन करताना जुने कर्ज नव्या कर्जाच्या साहाय्याने फेडले जाते म्हणजेच परिवर्तनामुळे प्रत्यक्षात कर्जफेड होतच नाही हे लक्षात ठेवणे जरुरीचे आहे.

**रोखे-फेड –**

पूर्वी उभारलेल्या कर्जाची फेड करण्यासाठी दरवर्षी काही कर्जरोख्यांची रक्कम परत केली जाते. यासाठी दरवर्षी किती रोख्यांची मुदत भरेल हे सुरुवातीलाच पाहिले जाते. त्याचप्रमाणे कोणत्या क्रमांकांच्या रोख्यांची मुदत प्रत्येक वर्षात भरत राहील हेही पाहिले जाते. कर्जफेडीच्या या पद्धतीमुळे शासकीय कर्जापैकी काही रकमेची प्रत्येक वर्षी परतफेड होत राहते.

**कर्जखरेदी –**

ज्या वेळी शासनाच्या अंदाजपत्रकात वाढावा असतो, त्या वेळी बाजारातून कजरोख्यांची खरेदी करण्याच्या धोरणाचा शासनाकडून अंगीकार केला जातो. पूर्वीच्या काळी ही पद्धती सरसकट अवलंबिली जात असे. अलीकडील काळात अंदाजपत्रकात क्वचितच वाढावा आढळत असल्याने कर्जफेडीची ही परंपरागत पद्धती अनुसरण्याचा प्रश्न क्वचितच उद्भवतो.

**कर्जफेड-निधी -**

शासकीय कर्ज फेडण्यासाठी स्वतंत्र निधी निर्माण करून त्यामध्ये हळूहळू वाढ केली जाते. उदाहरणार्थ, समजा धरण बांधण्यासाठी १० कोटी रुपयांचे, २० वर्षे मुदतीचे कर्ज उभारले गेले, तर त्याच वेळी शासन जादा पाणीपट्टी व सुधारकर अशा जादा कर आकारणीपासून मिळणारे उत्पन्न निधीमध्ये जमा करते आणि वीस वर्षे मुदतीपर्यंत साठत जाणाऱ्या त्या निधीतून कर्जाची मुदत भरताच कर्ज फेडले जाते. असा कर्जफेड निधी त्यासाठी जादा कर न आकारता सर्वसाधारण महसुलातूनही निर्माण करता येतो परंतु कित्येकदा असे घडते की, शासनाला वित्तीय अडचणीमुळे त्या निधीत साठणारी रक्कम कर्जाची मुदत भरण्यापूर्वीच

अन्य कारणांसाठी वापरावी लागते त्यामुळे कर्जफेड निधीचा हेतू सफल होऊ शकत नाही.

**भांडवलावर कर –**

शासकीय कर्ज फेडण्यासाठी भांडवलदार कर आकारण्याचा मार्ग काही वेळा अवलंबिला जातो. युद्धकाळात फार मोठ्या प्रमाणात कर्ज काढले जाते व ते युद्धासारख्या अनुत्पादक कारणांसाठी वापरले जाते. युद्धसमाप्तीनंतर अशा कर्जाचा बोजा प्रकर्षाने जाणवतो. असे कर्ज फेडण्यासाठी भांडवलावर कर आकारला जातो. युद्धकाळात भाववाढातिरेकी परिस्थिती निर्माण होत असल्याने उद्योगपती आणि व्यापारी प्रचंड प्रमाणात नफा मिळवून संपत्ति संचय करीत असतात. या संपत्तीपैकी काही भाग भांडवलावरील कराच्या मार्गाने काढून घेऊन त्याद्वारे फेडता येणे शक्य असते.

**परकीय कर्ज फेडण्यासाठी परकीय चलनांचे साठे वापरणे -** परकीय कर्ज फेडण्यासाठी देशाच्या निर्यातीतून मिळणाऱ्या परकीय चलनांपैकी काही भाग काढून ठेवून परकीय कर्ज फेडले जाते.

**तक्ता क्र. १: भारताचे सार्वजनिक कर्ज**

| वर्ष | सार्वजनिक कर्ज | सार्वजनिक कर्जाचे स्थूल देशांतर्गत उत्पादनाशी प्रमाण |
|---|---|---|
| २०१५ | १.२९८. १६ | ६८. ७८% |
| २०१६ | १,४४९.४८ | ६८. ७१ % |
| २०१७ | १६२६.८८ | ६९.४२ % |
| २०१८ | १,८०९, ०४ | ६९.५८% |
| २०१९ | २.०१६. ७३ | ७२. ३४% |

**Source:** www.statista.com

तक्ता क्रमांक १ वरून लक्षात येते कि, भारताचे सार्वजनिक कर्ज २०१५ मध्ये १.२९८.१६ अब्ज डॉलर होते. या कर्जाचे स्थूल देशांतर्गत उत्पादनाशी प्रमाण ६८.७८% होते. तर २०१६ मध्ये सार्वजनिक कर्ज १.४४९.४८ अब्ज डॉलर होते. स्थूल देशांतर्गत उत्पादनाशी याचे प्रमाणे ६८.७१% होते. २०१८ मध्ये सार्वजनिक कर्जात वाढ होऊन १८०९ .०४ अब्ज डॉलर होते. या कर्जाचे स्थूल देशांतर्गत उत्पादनाशी प्रमाण ६९.५८% होते. २०१९ मध्ये सार्वजनिक कर्जात वाढ होऊन २.०१६. ७३ या कर्जाचे स्थूल देशांतर्गत उत्पादनाशी प्रमाण ७२. ३४% झाले.

**तक्ता क्र. २: सामान्य सरकारी कर्ज**

| वर्ष | रक्कम (कोटीमध्ये) | GDP च्या टक्केवारीनुसार |
|---|---|---|
| २०११-१२ | ५९१७२७९ | ६७.७ |
| २०१२-१३ | ६६५५६८५ | ६६९ |
| २०१३-१४ | ७५६६७७३ | ६७.४ |
| २०१४-१५ | ८३३४८२६ | ६६.८ |
| २०१५-१६ | ९४७५२७२ | ६८८ |
| २०१६-१७ | १०५२४७७७ | ६८.४ |
| २०१७-१८ | ११७०२८९१ | ६८.५ |
| २०१८-१९ | १२९८२४६७ | ६८.७ |
| २०१९-२० | १४९९२७६५ | ७३७ |
| २०२१-२२ | १७३४६५१७ | ८७.८ |

**स्त्रोत- केंद्रीय अंदाजपत्रक २०२१-२२ भारत सरकार**

तक्ता क्रमांक २ मध्ये २०११-१२ ते २०२०-२१ या काळातील सामान्य कर्जाबाबतचे अध्ययन करण्यात आले आहे. २०११-१२ मध्ये सामान्य स्वरूपातील कर्ज ५९१७२७९ कोटी रुपये इतके असून जीडीपीच्या टक्केवारीनुसार ते ६७.७% इतके आहे. २०२०-२१ मध्ये सामान्य स्वरूपाच्या कर्जामध्ये वाढ होऊन ते १७३४६५१७ कोटी रुपये जीडीपीच्या ८७.८% इतके झाले आहे. यावरून असे स्पष्ट होते की, भारताचे सामान्य स्वरूपातील कर्ज प्रचंड प्रमाणात वाढत आहे.

**तक्ता क्रमांक ३: जगातील सर्वाधिक सार्वजनिक कर्ज असणारे देश**

| अ.नं. | देशांची नावे | 2023 सार्वजनिक कर्ज GDP च्या % (प्रकल्पित) US$ |
|---|---|---|
| १) | जपान | १५६ |
| २) | ग्रीस | १४८ |
| ३) | लेबनॉन | १२८ |

| | | |
|---|---|---|
| ४) | व्हेनेझुएला | १०७ |
| ५) | इटली | ११९ |
| ६) | पोर्तुगाल | १०७ |
| ७) | सिंगापूर | ११४ |
| ८) | मोझांबिक | ९५ |
| ९) | संयुक्त संस्थाने | २२७ |
| १०) | बेल्जियम | १६४ |

**(स्रोत: IMF आणि जागतिक आर्थिक दृष्टीकोन 2021)**

तक्ता क्रमांक ३ मध्ये जगातील सर्वाधिक कर्ज असणाऱ्या देशांचे वर्गीकरण करण्यात आले आहे. यामध्ये संयुक्त संस्थाने प्रथम क्रमांकावर, बेल्जियम दुसरा क्रमांक. जपान तिसऱ्या क्रमांकावर असल्याचे दिसून आले आहे. यावरून असे स्पष्ट होते की, जपान व संयुक्त संस्थाने या महासत्ता असूनही त्यांचे कर्जाचे प्रमाण प्रचंड प्रमाणात आहे.

**सारांश –**

स्वातंत्र्योत्तर काळात सार्वजनिक खर्च सातत्याने वाढला. करापासूनचे उत्पन्न पुरेसे नव्हते. भारतासारख्या अविकसित देशांत लोकांचे उत्पन्न कमी असते त्यामुळे त्यांच्या कर देण्याच्या क्षमतेवर मर्यादा पडतात. एकदा ही क्षमता गाठली की, कर रकमेत वाढ होऊन उत्पन्नात वाढ करणे सोपे होते. कर वाढीला लोकांकडून विरोध केला जातो. अशा परिस्थितीत सरकारला कर्जाच्या मार्गाने पैसा उभा करण्याशिवाय पर्याय नसतो. लोक सरकारी कर्ज रोख्यांमध्ये गुंतवणुका करण्यास तयार असतात कारण बचती कायम राहून थोडे फार उत्पन्न देखील मिळणार असते. सर्वसाधारणपणे सर्व अविकसित देशांत सार्वजनिक कर्जे खर्च आणि उत्पन्न यांच्यातील अंतर भरुन काढण्यासाठी उभी केली जातात. कराचे उत्पन्न काही ठराविक काळातच मिळते पण खर्च मात्र सतत करावा लागतो. अल्पकालीन गरज भरुन काढण्यासाठी भारत सरकार रिसर्व्ह बँकेकडून अल्पमुदतीची कर्जे काढते. ही कर्जे सर्वसाधारणपणे तीन महिन्यांत परत केली जातात. केंद्र सरकाराप्रमाणेच राज्य सरकारानांही कर्जे उभी करावी लागतात.

**संदर्भ ग्रंथ सूची –**


१. आगलावे प्रदीप (जानेवारी २०००), संशोधन पद्धती शास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन नागपूर.
२. रसाळ राजेंद्र (२०१५), समग्रलक्षी अर्थशास्त्र सक्सेस पब्लिकेशन, पुणे.
३. दिसले किरण (फेब्रुवारी २०१७), भारतीय अर्थव्यवस्था, दीपस्तंभ प्रकाशन जळगाव.
४. केंद्रीय अंदाजपत्रक २०२१-२२ भारत सरकार, नवी दिल्ली.
५. दैनिक लोकसत्ता
६. दैनिक महाराष्ट्र टाईम्स.
७. दैनिक पुढारी.


**श्रीमती. विद्या भिका थोरात[1], प्रो. डॉ.सुहास आव्हाड**